आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१६ फेब्रुवारी २०२५ रविवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं भारत टेक्स २०२५ मध्ये सहभागी होणार

- नवी दिल्ली स्थानकावरच्या दुर्घटनेच्या चौकशीसाठी रेल्वेची समिती स्थापन/ दुर्घटनेची जबाबदारी स्वीकारुन रेल्वेमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी काँग्रेसची मागणी

- भारतीय भांडवली बाजारामधून परदेशी गुंतवणूकदारांनी फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात २१ हजार २७२ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली

**आणि**

- नाशिक शहरात बनावट कॉल सेंटर चा छडा

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं भारत टेक्स २०२५ मध्ये सहभागी होणार आहेत. भारत टेक्स हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचं भव्य वस्त्रोद्योग प्रदर्शन असून ते उद्यापर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनांपर्यंत विविध उत्पादनं आणि यंत्रसामुग्रीचा समावेश आहे. प्रदर्शनाबरोबरच विविध चर्चासत्र आणि प्रशिक्षण कार्यक्रमही घेतले जात आहेत. नवोन्मेष उपक्रम आणि स्टार्ट अप दालन तसंच हॅकेथॉनवर आधारित स्टार्टअप पिच फेस्ट आणि निधी योजना असे कार्यक्रम, तसंच डिझाइन स्पर्धाही घेण्यात येत आहेत . ५००० हून अधिक प्रदर्शक, १२० हून अधिक देशांतील ६००० आंतरराष्ट्रीय खरेदीदार आणि इतर विविध अभ्यागत या प्रदर्शनात सहभागी होण्याची अपेक्षा आहे. ITMF म्हणजे आंतरराष्ट्रीय वस्त्रोद्योग उत्पादक

महासंघ, ICAC म्हणजे आंतरराष्ट्रीय कापूस सल्लागार समिती - यासह - जगभरातल्या २५ हून अधिक आघाडीच्या जागतिक वस्त्रोद्योग संस्था आणि संघटना यामध्ये सहभागी झाल्या आहेत.

**<><><><><>**

नवी दिल्ली स्थानकावर काल रात्री चेंगराचेंगरी होऊन किमान १८ जणांचा मृत्यू झाला. प्रयागराजला जाणाऱ्या गाड्यांमध्ये चढण्यासाठी अचानक अलोट गर्दी झाल्यामुळे ही दुर्घटना घडली. मृतांमधे महिलांचा, आणि दहा वर्षांखालील दोन बालकांचा समावेश आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची मदत जाहीर झाली आहे. नवी दिल्ली स्थानकावर परिस्थिती आता नियंत्रणात असल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. नवी दिल्ली स्थानकावरची गर्दी कमी करण्यासाठी दिल्लीहून प्रयागराजला जाण्यासाठी तात्काळ चार गाड्या सोडण्यात आल्याचंही त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशातून सांगितलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही अश्विनी वैष्णव तसंच दिल्लीच्या नायब राज्यपालांशी चर्चा केली. जखमींना तत्काळ आवश्यक ती मदत पुरवण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

फलाट क्रमांक १४ आणि १५ वर उतरण्यासाठी असलेल्या पुलावरुन उतरताना काहीजण घसरले त्यामुळे गर्दीतली माणसं एकमेकांवर कोसळल्यामुळे चेंगराचेंगरी झाल्याचं उत्तर रेल्वेच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितलं. या दुर्घटनेच्या चौकशीसाठी उत्तर रेल्वेचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक नरसिंह देव आणि मुख्य सुरक्षा आयुक्त पंकज गंगावार यांची समिती रेल्वेनं नेमली आहे. या समितीने स्थानकावरचे सीसीटीव्ही फूटेज राखून ठेवायचे निर्देश दिले आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या प्रियजनांचं त्यांनी सांत्वन केलं असून जखमी झालेल्यांना लौकर बरं वाटावं, अशी कामना केली आहे. प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनीही दुर्घटनेबद्दल तीव्र शोकभावना प्रकट केली आहे.  नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या दुर्घटनेची बातमी दुःखद आणि वेदनादायक आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केलं आहे. महाकुंभातून आणलेल्या गंगाजलाचा लाभ घेण्यासाठी नागपूरमधे आयोजित कार्यक्रमानंतर ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

**<><><><>**

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरच्या दुर्घटनेची जबाबदारी स्वीकारुन  रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी राजीनामा द्यावा अशी  मागणी काँग्रेसनं केली आहे. काँग्रेसच्या पक्ष प्रवक्ता सुप्रिया श्रीनेत यांनी आज नवी दिल्लीत  पत्रकार परिषद घेतली. दुर्घटनेच्या वेळी बचावकार्याऐवजी सरकार आकडे लपवण्यात गुंतलं होतं असा आरोप त्यांनी केला. दुर्घटनेच्या आधी तासाभरात पंधराशेहून अधिक तिकिटं विकली गेली होती, त्यामुळे रेल्वेला गर्दीचा अंदाज यायला हवा होता, असं त्या म्हणाल्या.

**<><><><>**

केंद्र सरकारच्या नेहरू युवा केंद्राचा ‘मेरा युवा भारत’ उपक्रम १३ ते १७ फेब्रुवारी दरम्यान जळगाव इथं सुरू आहे. या उपक्रमाअंतर्गत आंतरजिल्हा युवा आदानप्रदान कार्यक्रमात मुंबईतल्या २७ युवक युवतींचा समावेश आहे. राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी या युवकांशी संवाद साधत जळगावच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि कृषि परंपरेची माहिती दिली.

**<><><><>**

भारतीय भांडवली बाजारामधून परदेशी गुंतवणूकदारांनी फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात २१ हजार २७२ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली आहे.

जानेवारीत एकंदर ७८ हजार २७ कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक झाली होती. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इतर देशांमधून आयात मालावर अतिरिक्त शुल्क आकारण्याची घोषणा केल्यानंतर परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी सावध पवित्रा घेतला असावा, असं बाजार वर्तुळातल्या तज्ज्ञांचं मत आहे.

**<><><><><>**

नाशिक शहरात बनावट कॉल सेंटरच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीला आला आहे. यामध्ये अमेरिकेतल्या दीडशे नागरिकांची सुमारे १ कोटी ९२ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची माहिती नाशिक शहर सायबर पोलिसांनी दिली. हे कॉल सेंटर सुरु असलेल्या बंगल्यावर गुरुवारी रात्री पोलिसांनी छापा टाकला. इथे बारा लॅपटॉप आणि १३ मोबाईल्सच्या सहाय्याने बनावट कॉल सेंटर सुरु असल्याचं आढळून आलं. या प्रकरणी सातजणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. न्यायालयानं त्यांना मंगळवारपर्यंत पोलिस कोठडी दिली आहे.

**<><><><><>**

बालस्नेही विधी सेवा योजना २०२४ बाबत जनजागृती करण्यासाठी सांगलीत आज एक शिबीर आयोजित करण्यात आलं होतं. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या सामान्य किमान कार्यक्रमा अंतर्गत आयोजित या शिबिरात बालश्रम प्रतिबंध, पोक्सो यासारख्या बालहक्कांच्या कायद्यांची तसंच ऑनलाईन तक्रार नोंदणीसाठीच्या टोल फ्री क्रमांकाबद्दल मुलांना माहिती देण्यात आली.

**<><><><><>**

नाशिकमध्ये होणाऱ्या असमतोल पाणी वाटपाच्या पार्श्वभूमीवर येत्या ३ महिन्यात शहराच्या प्रत्येक भागात वॉटर मीटर बसवून अहवाल सादर करण्याचे आदेश जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महापालिकेला दिले आहेत. आगामी कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर गोदावरी स्वच्छ ठेवणं आणि प्रदूषणमुक्त करण्यात

प्रत्येकाचा सहभाग असायला हवा असं आवाहन त्यांनी आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना केलं.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात बाराबंकी इथं पूर्वांचल एक्सप्रेस वे वर आज पहाटे रस्ता अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला तर ६ पेक्षा जास्त जखमी झाले. महाराष्ट्रातून अयोध्येकडे चाललेली टेंपो ट्रॅव्हलर गाडी चालकाचं नियंत्रण सुटल्यानं रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या बसवर आदळून हा अपघात झाल्याचं समजतं. प्रवाशांपैकी एकाचा जागीच मृत्यू झाला तर ३ जण उपचारादरम्यान मरण पावले. मृतांची ओळख पटवण्याचं काम सुरु आहे असं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर सोलापूर शहराजवळ काल सायंकाळी झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले आहेत. सोलापूरकडून हैद्राबादकडे जाणाऱ्या एका वाहनानं, रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकींना धडक दिल्यामुळे हा अपघात झाला. दुचाकीस्वारांना धडक दिल्यानंतर दुभाजक ओलांडून वाहन एका मोटार गॅरेजवर आदळलं त्याचवेळी रस्त्यावरुन येणाऱ्या अनेक वाहनांनाही धडक बसली. या अपघातात गंभीर जखमी असलेल्या चौघांवर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**<><><><><>**

मुंबईतल्या मस्जिद बंदर भागात आज सकाळी एका इमारतीला लागलेल्या आगीत २ महिलांचा मृत्यू झाला तर ५ जण जखमी झाले. धुरामुळे गुदमरून जखमी झालेल्यांवर जे जे रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पोलीस आणि अग्निशमन दलानं घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली आहे. पोलीस आगीच्या कारणांचा तपास करत आहेत.

**<><><><><>**

मुंबईच्या फोर्ट भागातल्या एका दुमजली कार्यालयाला लागलेली आग आटोक्यात आणताना अग्निशमन दलाचा एक जवान जखमी झाला. त्याला ताबडतोब जीटी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्याची प्रकृती स्थिर आहे. आगीचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.

<><><><><>

रायगड जिल्ह्यातल्या पनवेल तालुक्यामधल्या कर्नाळा पक्षी अभयारण्यात पर्यटनासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांवर काल मधमाश्यांनी हल्ला केला. या घटनेत कोपरखैरणे इथल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर माटुंग्याच्या व्ही जे टी आय महाविद्यालयाचे ७ विद्यार्थी जखमी झाले. जखमींवर पनवेलमधल्या उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

<><><><><>

दिल्ली खुल्या टेनिस स्पर्धेत मासामिची इमामुरा आणि रिओ नागुची या जपानी खेळाडूंनी दुहेरी प्रकारात विजेतेपद पटकावलं. तर पुरुष एकेरी प्रकारात किरीयन जॅकवेट या फ्रेंच टेनिसपटूने विट कोप्रव्हाचा ६-३, ६-१ असा सरळ सेटमध्ये पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

//<><><><><>//